दैनिक औरंगाबाद

स्वतंत्र विचाराचे निर्भीड, नि:पक्ष, दर्जेदार दैनिक

# विश्व मित्र

औरंगाबाद आणि परभणी येथून एकाच वेळी प्रकाशित

रविवार दि. ११ मार्च २०१२

## आझाद अली शाह शिक्षण संस्थेच्या वतीने

# अल्पसंख्यांक समाजात उत्कृष्ट काम करणाऱ्या युवकांचा सत्कार

औरंगाबाद - प्रतिनिधी

आझाद अली शाह शिक्षण संस्था खडकेश्वर, औरंगाबाद यांच्या वतीने आयोजित सत्कार समारंभ नुकताच तापडिया नाट्य मंदिरात घेण्यात आले. कार्यक्रमात मुस्लिम अल्पसंख्यांक समाजात उत्कृष्ट काम करणाऱ्या समाज सेवकांचा राजेश टोपे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून माजी महापौर मनमोहनसिंग ओबेरॉय, रा.काँ. पक्षाचे शहर अध्यक्ष मुशताक अहेमद व संस्थेच्या अध्यक्षा सुरैया खान, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस साजिद पाशा आदी मान्यवर उपस्थित होते.



अल्पसंख्यांक समाजाच्या सत्कार सोहळ्यात विविध क्षेत्रात उत्कृष्ट कार्याबद्दल राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री राजेश टोपे यांच्या हस्ते सत्कार स्विकारतांना रियाज खान, मुजफ्फर अहेमद व मिर्झा अन्वर बेग सोबत पाहुणे मनमोहनसिंग ओबेरॉय, मुश्ताक अहेमद व साजिद पाशा आदी दिसत आहेत.

यावेळी बी.ई. सिव्हिल मध्ये स्वर्णपदक विजेते व राज्यपालांच्या हस्ते पुरस्काराने सन्मानित रियाज बिस्मिल्ला खान, हज यात्रेकरुंची गेल्या पाच वर्षांपासून विमानतळावर निस्वार्थ सेवा करणारे मुजफ्फर बाऊद्दिन सिद्दीकी तसेच सामाजिक, धार्मिक व राजकीय युवक काँग्रेसचे जालना शहर अध्यक्ष तथा नगरसेवक मिर्झा अन्वर बेग यांचा महाराष्ट्र राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री राजेश टोपे यांच्या हस्ते शाल श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

या वेळी राजेश टोपे यांनी आपल्या भाषणात युवकांना विविध ... आपले नाव समाजामध्ये नाव लौकिक करुन स्वत:ची ओळख निर्माण करावी अशा व्यक्तींना सामाजिक संस्थांनी वेळोवेळी सन्मानित करुन उच्च कार्य करण्यासाठी तरुणांना प्रोत्साहीत करावे. ज्यामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढेल. त्यातून स्वत:ची समाजाची व देशाच्या प्रगतीस हातभार लागेल असे प्रतिपादन केले. साजिद पाशा यांनी सत्कारमूर्तीचा परिचय करून दिल्यावर त्यांच्या महत्वपूर्ण कार्यात योगदानाबद्दल कौतूक करून अभिनंदन केले व अशाच प्रकारे इतरांना अशा कार्यात सामावुन घेऊन त्यांनाही प्रोत्साहन दद्यवे असे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आरीफ शेख यांनी तर आभार प्रदर्शन मकिम पटेल यांनी मानले.